MHPU170003752018



**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ९३/२०१८ निशाणी २७ खालील पोटगीच्या मागणी संदर्भातील आदेश</u>**

**<u>वर्षा मोरे वि. धर्मेंद्र मोरे व इतर</u>**

सदरचा मूळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, २००५ या कायद्यातील कलम २३ नुसार दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज अर्जदार हिने जाबदेणार क्र.१ कडून उदरनिर्वाह, औषधोपचार व दैनंदिन गरजासाठी प्रत्येकी रक्कम दरमहा रू.१५,०००/— अंतरीम पोटगी मिळण्याकरीता म्हणून केलेला आहे. जाबदेणार यांनी **<u>नि.३४—ए</u>** खाली म्हणणे देवुन अर्जदार हिचे अर्जातील संपुर्ण मजकुर नाकारला आहे. सबब, अर्जदार हिचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०२. दोन्ही बाजुच्या पक्षांचे कथन पाहता खालील मुद्दे माझे विचारार्थी निश्चित होतात त्यांचे निष्कर्ष कारणांसह पुढीलप्रमाणे.

| **अ. क्र** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार हिचा जाबदेणार यांनी कौटूंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते काय? | ...होकारार्थी |
| २ | अर्जदार ही जाबदेणार क्र.१ याच्याकडून पोटगी म्हणून रक्कम रूपये १५,०००/— दरमहा मिळण्यास पात्र आहे काय? | ...अंशत: होकारार्थी. |
| ३ | काय आदेश? | अर्ज अंशत: मंजुर करण्यात आला. |

**: कारणमीमांसा :**

**मुददा क्र. १ बाबत :—**

०३. अर्जदार हिने अभिलेखावरती दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व जाबदेणार यांची कथने व युक्तिवादातील मुददे लक्षात घेतले असता त्यांनी जाबदेणार यांचेवर बरेचसे आरोप केलेले आहेत व त्यासंबंधी विस्तृत पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अर्जदार हिने तिचे कथनाचे पुष्टयर्थ अर्ज **नि.३** सोबत जाबदेणार नं.१ यांना पाठविलेल्या नोटीस उत्तरीची छायांकित प्रत, जाबदेणार यांना पाठविलेल्या रजि. नोटीसीची मुळ पावती, जाबदेणारास नोटीस मिळाल्याची पोहोच पावतीची, अर्जदारने जाबदेणाराविरूध्द इंदापूर पोलीसात दाखल केलेल्या फिर्यादची छायांकित प्रत, इंदापूर पोलीस स्टेशनची प्रथम खबरी अहवाल नं.९३९ची छायांकित प्रत, मुलगा संग्राम याच्या जन्म दाखल्याची छायांकित प्रत व मुलगा पियुष याच्या जन्म दाखल्याची छायांकित प्रत दाखल केली आहे. तसेच अर्जदारने यादी **नि.१४** सोबत इंदापूर पोलीस स्टेशन येथे जाबदेणार यांच्याविरूध्द दाखल केलेल्या तक्रारीची छायांकित प्रत दाखल केली आहे. तसेच **नि.२९** वर स्वत:चे मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच यादी **नि.३२** सोबत मे. वरिष्ठ न्यायालय, बारामती येथील न्यायालयातील मॅ.पि.अ.नं.७०/२०१८ च्या नि.१च्या आदेशाची साक्षांकित प्रत, मे.वरिष्ठ न्यायालय,

बारामती येथील न्यायालयातील मॅ.पि.अ.नं.७०/२०१८ च्या नि.१८ च्या अर्जाची व आदेशाची साक्षांकित प्रत दाखल केलेली आहे. तसेच अर्जदार हिने यादी **नि.३६** सोबत मौजे व्याहळी येथील गट नं.४३०/२ चा ७/१२ उता—याची साक्षांकित प्रत दाखल केलेली आहे.

०४. याउलट जाबदेणार यांनी सी.आर.पी.सी.९७ अन्वयेच्या अंतिम आदेशाची छायांकित प्रत, बारामती न्यायालयात दाखल गु.र.क्र. ३०४/२०१७ ची छायांकित प्रत, बानाफाईडचे छायांकित प्रत, नोटीसची छायांकीत प्रत, संग्राम याच्या जन्माचा दाखल्याची छायांकित प्रत दाखल केली आहे. याव्यतिरीक्त कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही.

०५. अर्जदार यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराची कथने व युक्तिवादातील मुददे लक्षात घेतले असता त्यांनी जाबदेणार यांचेवर बरेचसे आरोप केलेले आहेत व त्यासंबंधी विस्तृत पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक आहे. परंतू अभिलेखावर **<u>नि.३७—ए</u>** वरील जाबदेणार यांनी दिलेले म्हणणे पाहता अर्जदार व जाबदेणार यांचे वैवाहिक संबध वादातीत नाहीत. त्यामुळे अर्जदार व जाबदेणार यांच्यामध्ये पती पत्नीचे नाते असल्याचे दिसून येते. अर्जदार हिचा अर्ज व शपथेवरील प्रतिज्ञापत्रामधील कथने पाहता जाबदेणार यांनी अर्जदार हिचा कौटूंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत आहे व त्यावरून अर्जदार हिचा

प्रथमदर्शनी कौटूंबिक छळ झाला हा निष्कर्ष काढता येवु शकतो. सबब, मुद्या क्र. १ होकारार्थी नोंदवण्यात आला.

**मुददा क्र. २ बाबत :—**

०६. अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे तिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून ती स्वत:चा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे. या उलट जाबदेणार यांची आर्थिक परिस्थीती अत्यंत चांगली असून जाबदेणार हा कर्मयोगी शंकराराव पाटील सारख कारखान्यात कायम स्वरूपी नोकरीस असून त्यास दरमहा रू२५,०००/— पगार मिळतो. तसेच जाबदेणार यास मौजे व्याहळी, ता इंदापूर येथे ५ एकर बागायती शेती असून त्यापासून त्यास दरसाल दहा लाख उत्पन्न मिळते. तसेच जाबदेणार याचा दुधाचा व्यवसाय सुरू केला असून जाबदेणार याच्याकडे २० जर्शी गाईपासून दरमहा पन्नास हजारांचे उत्पन्न मिळते. जाबदेणार याच्याकडे महिंद्रा कंपणीची स्कॉर्पिओ गाडी असून असून त्यापासून त्यास तीस हजारांचे उत्पन्न मिळते. त्यामुळे जाबदेणार हा अर्जदार हिस पोटगी देण्यास समर्थ असल्याचे कथन केले आहे.

०७. अर्जदार यांच्या अर्जास जाबदेणार यांनी सदयस्थितीत प्रस्तुत प्रकरणाची स्टेज अंतरिम अर्ज दाखल करण्याची नाही असा प्रमुख आक्षेप घेतला आहे. तथापी, अर्जदार यांनी दाखल केलेल्या एम एम पी

७०/२०१८ मध्ये नि.१८ चे अवलोकन केले असता प्रस्तुत अर्जदार हिने हिंदू विवाह कायदा कलम २४ अन्वये अंतरिम पोटगी व निर्वाह भत्ता मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्या अर्जावरती दि.०९/०२/२०२१ रोजी आदेश होवून अर्ज अंशत: मंजूर करण्यात आला होता व अर्जदारास दि. ०५/११/२०१९ पासून प्रस्तुत केसमधील जाबदेणार यांनी रक्कम रू. ३,०००/— त्या अर्जाचा निकाल लागेपर्यंत देण्याचा आदेश केला होता. तसेच, प्रस्तुत अर्जदारास केसचे खर्चाकामी रू.७,०००/— देण्याचा आदेश झाला होता. अर्जदार यांनी यादी नि.३२ अन्वये दाखल केलेल्या मॅ.पि. अर्ज नं.७०/२०१८ चे छायांकित प्रतीचे त्यावरील दि.०२/१२/२०२२ रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, जाबदेणार क्र.१ याने बारामती येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर येथे हिंदू विवाह कायदा कलम १३(१)(i)(१) व १३(१)(ia) प्रमाणे विवाहविच्छेदन होणेकामी दाखल केला होता. सदरचा अर्ज दि. ०२/१२/२०२२ रोजी प्रस्तुत केसमधील जाबदेणार हजर नसल्याने Dismiss for default असा आदेश होवून रद्द झालेला आहे. सबब, मॅ.पि. नं.७०/२०१८ मधील नि.१८ अन्वये मिळणारी रक्कम रू.३,०००/— पोटगी सदयस्थितीत अर्जदारास मिळत नसल्याचे दिसून येते.

०८. तसेच अर्जदार हिने दाखल केलेल्या मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता तिला उपत्नाचे कोणतेही साधन

नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. याउलट जाबदेणार याने त्याचे मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले नसल्याचे दिसून येते.

०९. अर्जदार व जाबदेणार यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकता अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे कथन केले आहे. तसेच अर्जदार हिनेदेखील जाबदेणार हा कर्मयोगी शंकराराव पाटील सारख कारखान्यात कायम स्वरूपी नोकरीस असून त्यास दरमहा रू२५,०००/— पगार मिळतो. तसेच जाबदेणार याचा दुधाचा व्यवसाय सुरू केला असून जाबदेणार याच्याकडे २० जर्शी गाईपासून दरमहा ५०,०००/— उत्पन्न मिळते. जाबदेणार याच्याकडे महिंद्रा कंपणीची स्कॉर्पिओ गाडी असून असून त्यापासून त्यास रू. ३०,०००/—हजारांचे उत्पन्न मिळते. या तिच्या कथनाच्या पृष्टर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. परंतू अर्जदार यांनी दाखल केलेल्या यादी **नि.३६** वरील ७/१२ उता—याचे अवलोकन केले असता, जाबदेणार क्र.१ ते ४ यांच्या नावे सामाईकात २.०२.५० इतके क्षेत्र नमूद असल्याचे दिसून येते व त्या अन्वये जाबदेणार हे पिके घेत असल्याचे दिसून येते. जाबदेणार क्र.१ याची अर्जदार हिचा पती म्हणून असणारी नैतिक व कायदेशीर जबाबदारी नाकारता येणार नाही. सबब, अभिलेखावरील उपस्थित पुराव्याचा विचार करता अर्जदार ही स्वत:चे चरितार्थ चालविण्यास सक्षम नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब,

जाबदेणार क्र.१ यांच्याकडून अर्जदार रक्कम रू.१,५००/— (रूपये एक हजार पाचशे फक्त) दरमहा पोटगी म्हणून अर्जदाखल तारखेपासून ते मुळ अर्जाचा अंतिम आदेश होईपर्यंत मिळण्यास पात्र आहे. सबब, मुद्या क्र.२ हा अंशत: होकारार्थी नोंदवण्यात येतो.

**मुद्या क्र.३ बाबत**

१०. सदरच्या मुद्या क्र. १ व २ बाबतचे निष्कर्ष लक्षात घेता मुद्या क्र.३ चे उत्तर खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्जदार हिचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) जाबदेणार क्र. १ याने मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत अर्जदार हिस रक्कम रू १,५००/— (रूपये एक हजार पाचशे फक्त) दरमहा अंतरिम पोटगी म्हणून सदरचा अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि.१९/११/२०२२ पासून द्यावेत.

३) सदर आदेशाची प्रत संबंधीत पोलीस स्टेशन व संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

४) अर्जदार व जाबदेणार यांना सदर आदेशाची प्रत विनामूल्य देण्यात यावी.

इंदापूर.
दिनांक :१५/०३/२०२४.

(**श्रीमती एस.एस.साळुंखे**)
३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर, पुणे.

MHPU170003752018



**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ९३/२०१८ निशाणी २७ खालील पोटगीच्या मागणी संदर्भातील आदेश**

**वर्षा मोरे वि. धर्मेंद्र मोरे व इतर**

**प्रमाणपत्र**

**मी याद्वारे असे प्रमाणीत करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकुराच्या शब्दानुसार समान आहे.**

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :: | श्रीमती. एस.एस.साळुंखे,<br>३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर |
| लघुलेखकाचे नाव | :: | एम.पी.अंबुरे,<br>लघुलखेक निम्नश्रेणी—३ |
| आदेशाची तारीख | :: | १५/०३/२०२४ |
| न्यायालयाने सही केल्याची तारीख | :: | १५/०३/२०२४ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :: | १५/०३/२०२४ |